# प्रकरण पाचवे

# उपसंहार

पृष्ठ क्रमांक : १४३ ते १५६

## प्रकरण पाचवे

## उपसंहार

'स्त्रियांच्या कहाण्या –रूपबंधात्मक अभ्यास' हा विषय एम्. फिल्. च्या अभ्यासासाठी निवडला आहे. 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रहाच्या' आधारे, त्यातील कहाण्यांचा रूपबंध उलगडण्याचा विशेष प्रयत्न संशोधनात केला आहे.

लोकसाहित्य हे चिरंतन अशा उदात्त जीवन व सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणारे अक्षर वाङ्मय आहे. भारतीय लोकसाहित्याचे दालन भव्य आणि दिव्य असून ते अत्यंत संपन्न आहे. या लोकसाहित्यामध्ये लोकवाङ्मयाचा खूप मोठा एक भाग आहे. लोकवाङ्मयाचे गद्यपद्य असे प्रकार आहेत. त्यापैकी गद्य वाङ्मयाचा मोठा हिस्सा लोककथांनी व्यापला आहे. स्त्रियांच्या कहाण्यांचा समावेश लोककथेमध्येच केला जातो.

स्त्रियांचा व्रतवैकल्यांशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे व्रतकहाण्या या स्त्री जीवनाशीच अधिक निगडित असल्याचे आढळते. कहाणी किंवा व्रतकथा जाणीवपूर्वक विशिष्ट हेतूने निर्माण केलेल्या आहेत, असे कहाणीचा अभ्यास केल्यानंतर प्रत्ययाला येते.

**प्रकरण पहिले :–**

'रूपबंधाचे स्वरूप' या पहिल्या प्रकरणात लोकसाहित्य म्हणजे काय ? आदिबंधांचे स्वरूप, कल्पनाबंधाचे स्वरूप, आणि रूपबंधाचे स्वरूप अभ्यासले आहे. लोकसाहित्य हा मौखिक परंपरेने चालत येणारा आणि समूहाकडून निर्माण केला जाणारा प्रकार आहे. लोकसाहित्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी केला आहे. त्यापैकी गंगाधर मोरजे यांची व्याख्या मला सर्वांत अधिक परिपूर्ण वाटते. ते म्हणतात, 'लोकसाहित्य म्हणजे जनसमूहाने आपल्या भावभावनांचा सार्थ शद्बांच्या माध्यमातून केलेला आविष्कार होय. 'मोरजे यांनी समाजाने संघटीतपणे व्यक्त केलेल्या भावनांना महत्त्व दिले आहे. लोकसाहित्याचे स्वरूप पाहत असताना त्यातील लोकसमजुती, लोकभ्रम, लोकश्रद्धा, चालीरीती, विधी, विविध सण–उत्सव या संकल्पना समजावून घेतल्या.

आदिबंधाच्या स्वरूपाबाबत अनेक अभ्यासकांनी आपले विचार मांडले आहेत. आदिबंध ही अबोध कल्पना असते. त्याचप्रमाणे ती अमूर्त व रचनामूलक संकल्पना आहे. लोककथा, परिकथा, दैवतकथा म्हणजे आदिबंधाचे आविष्कार असल्याचे आढळते. हे आदिबंध वेगवेगळ्या मानस-प्रतिमांमधून व्यक्त होत असतात. जगाच्या पाठीवर कोठेही गेलो तरी आदिबंध हे स्थलकालातीत, शाश्वत व वैश्विक असतात, असे अभ्यास केल्यानंतर आढळले. लोककथेच्या लहानातील लहान अंशाला कल्पनाबंध म्हणावेसे वाटते. कारण ते स्वतंत्रपणे स्थिर राहतात आणि त्यांच्यात असाधारण असे तत्त्व आढळते. लोककथांत वारंवार आवृत्त होणारे कल्पनाबंध लोककथेच्या अभ्यासकांनी शोधून काढले आहेत. पऱ्या, चेटकिणी, क्रूर सावत्र आई, बोलणारे पक्षी लोककथांत आढळतात तर परग्रहावरील सजीव, रोबो, उडत्या तबकड्या यांच्या स्वरूपात काही कल्पनाबंध विज्ञानकथांत आढळतात. ज्याप्रमाणे कथानकाशिवाय कथा अस्तित्वात येत नाही, त्याचप्रमाणे कल्पनाबंधाशिवाय लोककथा संभवू शकत नाही असे म्हणावेसे वाटते. कल्पनाबंध स्थल-काल परिस्थितीशी निगडित पर्यावरणातून, मानवी जाणिवा व भावना यांमुळे निर्माण होत असतात, असे अभ्यास केल्यानंतर आढळते.

रूपबंधाच्या स्वरूपाचा शोध घेताना असे आढळले की, मूळ घटकांचे स्वरूप आणि त्या घटकांची मांडणी किंवा रचना त्या-त्या रचना प्रकाराचा रूपबंध निश्चित करीत असते. स्त्रियांच्या कहाण्यांच्या संदर्भात स्त्रियांच्या भावभावना, विचार, अनुरूप शब्दांची वर्णरचना, उच्चारातील मृदुत्व, काठीण्य, ताल-लय-सूर, भाषेचा लवचिकपणा, छोटी-छोटी वाक्ये या अशा विविध घटकांतून रूपबंध उलगडत जातो. लक्षणीयता, आविष्कारात्मकता, वैशिष्ट्यपूर्णता या सौंदर्याची जाणीव निर्माण करणाऱ्या घटकांनी साहित्यकृतीला रूपबंध प्राप्त होत असतो, असे अभ्यासाअंती आढळून आले आहे.

**प्रकरण दुसरे :-**

'स्त्रियांच्या कहाण्या स्वरूप' या प्रबंधिकेच्या दुसऱ्या प्रकरणात व्रत म्हणजे काय? त्याचे स्वरूप, व्याख्या, प्रकार यांचा अभ्यास केला आहे. त्याचप्रमाणे कहाणी म्हणजे काय ? त्याचे

स्वरूप, व्याख्या जन्मकाळ, स्त्रियांच्या कहाण्यांचे हेतू आणि स्त्रियांच्या कहाण्यांची धार्मिक व सामाजिक कारणे अभ्यासली आहेत.

कहाणी म्हणजे व्रतकथा. मनुष्याचे या जन्मातील आयुष्य सुखसमृद्धीचे जावे म्हणून, व्रते–नेमधर्म त्याने करावे या हेतूने कहाण्या लिहिल्या गेल्या असाव्यात असे वाटते. कहाण्यांचे स्वरूप अभ्यासत असताना, कहाण्यांच्या व्याख्याही अनेक अभ्यासकांनी केलेल्या आढळल्या. त्यापैकी डॉ. अश्विनी धोंगडे यांनी, 'पिढ्यान्‌पिढ्या मौखिक परंपरेनं सांगितलं जाणारं किंवा भक्तिभावानं वाचलं जाणारं साहित्य म्हणजे कहाण्या' असे म्हटले आहे. कहाण्यांचे अंतरंग तपासता, त्यांचा जन्म १६ व्या शतकात झालेला असावा; असा एक अंदाज अभ्यासकांनी मांडला आहे. कहाणीच्या स्वरूपाबाबत असे म्हणता येईल की, कहाणी सामान्यत: गद्यात असते. तिचे वळण लोककथांचे असते. लोकक्कथांपेक्षा कहाणीची भाषा अधिक काव्यमय, प्रौढ, प्रमाण भाषेच्या जवळ जाणारी आणि संस्कृत वळणाची असते. लहान–लहान वाक्ये, वेचक शद्ब आणि ओघवती पण घरगुती भाषा, चित्ताकर्षक कल्पना, कौशल्यपूर्ण घटना, अद्‌भूत चमत्कार आणि एकसारखे पुढे काय, पुढे काय ही अधीरता या कहाणीच्या प्रमुख भावभावना आढळतात. मानवाच्या प्रत्येक कृतीमागे काही ना काही प्रयोजन असते. त्याप्रमाणे कोणतेही व्रत करण्यामागे व्यक्तीचा काही ना काही हेतू निश्चितच असतो यात शंका नाही. इच्छित वरप्राप्ती होण्यासाठी, नावडतेपणा संपण्यासाठी, गरिबी नाहीशी होण्यासाठी, संकटे दूर होण्यासाठी, वैधव्य टळण्यासाठी त्याचप्रमाणे संतती, संपत्ती, पुण्य लाभण्यासाठी आणि सुखसमाधान मिळण्यासाठी व्रते केली जातात असे अभ्यासाअंती आढळते. त्याचप्रमाणे या व्रतकहाण्यांतून जीवनमूल्ये, नीतीमूल्ये, चांगले आचरण, बंधुभाव, सामाजिक ऐक्य यांची शिकवण दिलेली आढळते. ही मूल्ये समाजात रूजावी या कारणानेही लोक व्रते करतात आणि कहाणी वाचतात असे अभ्यास केल्यानंतर आढळते.

**प्रकरण तिसरे :-**

'कहाण्यांच्या आशयाचा अभ्यास' या प्रस्तुत प्रकरणात 'सुबोध व सचित्र कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील कहाण्यांच्या आशयाचा अभ्यास केला आहे.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वरील पुस्तकातील पहिली कहाणी ही 'श्रीगणपतीची' आहे. कोणत्याही शुभकार्यात प्रथम गणपतीचे पूजन महत्त्वाचे मानले जाते. त्याप्रमाणेच या कहाण्यांतही पहिल्यांदा श्रीगणपतीच्या कहाणीला मानाचे स्थान देण्यात आले आहे. गोपद्मांच्या कहाणीत प्रत्येक स्त्रीने आषाढातील दशमीपासून कार्तिक दशमीपर्यंत तीस तीन गोपद्मं देवाच्या, ब्राह्मणाच्या, पिंपळाच्या द्वारी, तळ्याच्या पाळी आणि गाईच्या गोठ्यात काढून पूजा केल्यास संकटे टळतात. पांचा देवांच्या कहाणीत पार्वतीच्या सांगण्याप्रमाणे एक ब्राह्मण बाई पाच देवांची मनोभावे पूजा करते. त्यामुळे तिला सर्व देव प्रसन्न होतात आणि ती सुखीसमाधानी होते. धरित्रीच्या कहाणीत सहा रेघांचा चंद्र, सूर्य आणि सहा गाईची पावले तसेच धरित्रीमायेचे नित्यनेमाने चिंतन, वंदन आणि पूजन करण्यास सांगितले आहे.

दिव्यांच्या अवसेच्या कहाणीत एक दिवस सून घरातला पदार्थ स्वत: खाऊन, त्याचा आळ उंदरांवरती घेते. उंदीर सूड घेण्याच्या हेतूने तिची चोळी रात्रीच्या वेळी पाहुण्यांच्या अंथरूणात नेऊन टाकतात. त्यामुळे तिची निंदानालस्ती होऊन, तिला घराबाहेर हाकलून दिले जाते. ती घरात नसल्यामुळे घरातल्या दिव्यांकडे सर्वांचे दुर्लक्ष होते. एक दिवस दिव्याच्या बोलण्यातून राजाच्या लक्षात येते की, घडलेल्या प्रकारात सुनेचा काहीच दोष नाही. त्यामुळे तो सुनेला घरी परत आणतो. सुनेला दिवा पावतो आणि तिच्यावरचा आळ टळतो असे या कहाणीत आढळून येते. आदित्यराणूबाईच्या कहाणीत, राजाच्या राणीने बापाची कहाणी ऐकली नाही म्हणून तिला दारिद्र्यता येते. आपल्या बहिणीकडे काहीतरी सोनमोहरा आणण्यासाठी चार रविवारी आपल्या चार मुलांना पाठवते. पण, सूर्यनारायण कधी माळ्याच्या, गुराख्याच्या, घारीच्या रूपाने येऊन सोनमोहरा घेऊन जातो. त्यामुळे ती पाचव्या रविवारी स्वत: जाते. बहीण आदितवाराची कहाणी करू लागताच, आपणही तिच्याबरोबर नित्यनेमाने मनोभावे आदितवाराचे व्रत करते. या व्रताच्या प्रभावामुळे सूर्यदेव तिला प्रसन्न होतात आणि ती पूर्वीसारखी सुखीसमाधानी झाल्याचे आढळते.

प्रस्तुत पुस्तकात सोमवारच्या पाच कहाण्या आढळतात. सोमवारच्या खुलभर दुधाच्या कहाणीत एक म्हातारी बाई घरातल्या सर्वांचा आत्मा तृप्त करून, खुलभर दूध गाभाऱ्यात ओतते.

त्यामुळे देवाचा गाभारा दुधाने भरून जातो. म्हातारीला बक्षीस मिळते. असे या कहाणीत आढळून येते.

सोमवारच्या शिवामुठीच्या कहाणीत राजाच्या नावडत्या सुनेला अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागतात. मग, नागकन्या-देवकन्या यांच्या सांगण्यावरून ती महादेवाची मनोभावे पूजा करते. तांदूळ, तीळ, मूग, जवस आणि सातू यांची शिवामूठ वाहते. तिच्या अखंड व्रतामुळे शंकर सर्वांना दर्शन देतात आणि ती सर्वांची आवडती झाल्याचे आढळते. सोमवारच्या साध्या कहाणीत एक ब्राह्मण पती-पत्नी मनापासून शंकराची पूजा करून, नित्यनेमाने व्रत करतात. शंकराच्या कृपेमुळे उष्टी ताटे सोन्याची होतात, रत्नांनी भरतात, तिला अर्ध घटकेचे माहेर मिळते आणि तिची इच्छा पूर्ण होते.

सोमवारच्या फसकीच्या कहाणीत एक गरीब सवाष्ण बाई, श्रावण महिन्यात दर सोमवारी महादेवाची पूजा करते आणि 'जय महादेवा, घे फसकी व दे लक्ष्मी' असे म्हणून महादेवाच्या मस्तकावर व नंदीच्या पाठीवर तांदूळ वाहते. त्यामुळे शंकर तिला प्रसन्न झाल्याचे या कहाणीत आढळते. सोळा सोमवारांच्या कहाणीत पार्वती गुरवाला शाप देते. त्या शापाने गुरव कोडाने भरून जातो. यावर उपाय म्हणून गुरव अप्सरांच्या सांगण्यावरून सोळा सोमवारांचे व्रत करून कुष्ठरहित होतो. हे पाहून पार्वती, कार्तिकस्वामींचा ब्राह्मण मित्र, त्या ब्राह्मणाची मुलगी हे व्रत करते आणि त्यांना इच्छित फळ मिळते.

प्रस्तुत कहाण्यासंग्रहात नागपंचमीच्या दोन कहाण्या आढळतात. एका कहाणीत राजाच्या सुनेला शेषभगवानाच्या आशीर्वादाने नागलोक माहेर मिळते. तिथे ती नागिणीचे बाळंतपण करते. भीतीने तिच्या हातातील दिवा पिल्लांच्या शेपटावर पडल्यामुळे पिल्लांची शेपटे भाजतात. मग, मोठे झाल्यानंतर पिल्लांना हकीकत कळल्यामुळे मुलीचा सूड घेण्याचे ते ठरवितात. पण, मुलगी भक्तिभावाने नागपंचमीचे व्रत करते हे पाहून ते आपला विचार बदलतात. आणि तिला नवरत्नांचा हार भेट देऊन निघून जातात. दुसऱ्या कहाणीत एका शेतकऱ्याकडून शेत नांगरताना नांगराचा फाळ वारूळाला लागतो. त्यामुळे नागाची नागकुळे मरतात. शेतकऱ्याचा सूड घेण्याच्या हेतूने नागीण त्याचा निर्वंश

करते. पण, त्याची एक मुलगी नागपंचमीचे व्रत करत असल्याचे तिला दिसते. मग, ती मुलीवर प्रसन्न होते. नागिणीने दिलेल्या अमृतामुळे मुलीच्या माहेरची माणसे जिवंत झाल्याचे प्रस्तुत कहाणीत आढळते.

वर्णसटीच्या कहाणीत ब्राह्मणाची सातवी मुलगी, 'मी माझ्या नशिबाची' असे ब्राह्मणाला सांगते. त्यामुळे ब्राह्मण रागाने तिचे लग्न एका भिकारड्याशी लावून देतो. कालांतराने तिचा नवरा मरतो. ती स्मशानात एकटी नवऱ्याचे प्रेत मांडीवर घेऊन रात्रभर बसते. शेवटी शिवपार्वतीच्या सांगण्यावरून मावशीकडून वर्णसटीचे पुण्य आणते. त्यामुळे तिचा नवरा जिवंत होतो. शिळासप्तमीच्या कहाणीत प्रजेच्या हितासाठी, सर्वांना पाणी मिळावे या हेतूने आपल्या नातवाचा बळी देतो. त्यामुळे तळ्याला पाणी लागते. सुनेच्या शिळासप्तमीच्या व्रताने तिचा मुलगा परत जिवंत होतो. मंगळागौरीच्या कहाणीत एका वाणी पती–पत्नीला देवीच्या कृपेमुळे गुणी पण अल्पायुषी पुत्र होतो. काशी यात्रेला गेल्यानंतर मुलाच्या मामाला मंगळागौरीचे व्रत करणाऱ्या स्त्रीची मुलगी भेटते. तो तिच्याशी भाच्याचे लग्न लावतो. यम भाच्याचे प्राण नेण्यास आला असता, मंगळागौर त्याला अडविते आणि त्याचे मरण टळते. मग, सर्वजण सुखाने नांदतात.

बुध–बृहस्पतीच्या कहाणीत एका राजाला सात मुलगे व सात सुना होत्या. त्यांच्या घरी रोज एक मामा–भाचे भिक्षेला जात. पण, राजाच्या सुना त्यांना भिक्षा घालत नसत. काही दिवसांनी राजा दरिद्री होतो. तेव्हा धाकटी सून या ब्राह्मणांची माफी मागते. ते तिला उपाय सांगतात. त्याप्रमाणे ती बुध–बृहस्पतीचे व्रत करते. या व्रताच्या पुण्याईने तिला संतती, संपत्ती, सुखसमाधान मिळाल्याचे प्रस्तुत कहाणीत दिसून येते. पिठोरीच्या कहाणीत एका ब्राह्मणाच्याघरी श्रावणातल्या अवसेदिवशी बापाचे श्राद्ध असे. त्याच दिवशी त्याची सून बाळंत होते आणि ब्राह्मण उपाशीपोटी परत जात. असे सहा वर्षे घडते. सातव्या वर्षीही असाच प्रकार घडतो. मग, ब्राह्मण तिला मेलेले मूल ओटीत घालून हाकलून देतो. झोटिंगाच्या बायकोच्या सांगण्यावरून ती जंगलात जाते. तेथे तिला नागकन्या–देवकन्या आणि साती आसरा भेटतात. त्या तिला चौसष्ट योगिनींचे व्रत करण्यास सांगतात. त्याप्रमाणे ती व्रत करते. त्यामुळे तिची मुले परत येतात. मग, सर्वजण सुखासमाधानाने राहतात.

हरितालिकेच्या कहाणीत इच्छित वरप्राप्ती होण्यासाठी, शंकर पती म्हणून मिळण्यासाठी पार्वती हरितालिकेचे व्रत भक्तिभावाने व्रत करते. त्या व्रताच्या प्रभावाने शंकर तिला प्रसन्न होतात आणि तिची इच्छा पूर्ण होते. वटसावित्रीच्या कहाणीत सावित्री भक्तिभावाने ज्येष्ठ पौर्णिमेला व्रत करते आणि आपल्या बुद्धीचातुर्याने यमाला प्रसन्न करून घेते. त्याच्याकडे ती सौभाग्य, संतती, समृद्धी मागते. तेव्हा यम स्वत:च्याच वचनात गुंतल्यामुळे सत्यवानाचे प्राण परत करतो.

प्रस्तुत कहाण्यासंग्रहात शुक्रवारच्या दोन कहाण्या आल्या आहेत. त्यापैकी शुक्रवारच्या जिवत्यांच्या कहाणीत राणी सुईणीकडून एका गरीब ब्राह्मण बाईचे बाळ चोरून आणते. त्यामुळे ती बिचारी बाई दु:खीकष्टी होते. आपला मुलगा जिथे असेल तिथे सुखरूप रहावा म्हणून ती जिवती देवीचे शुक्रवारचे व्रत करते. देवी तिला प्रसन्न होऊन, तिचा मुलगा शेवटी तिला परत मिळतो. दुसऱ्या कहाणीत एक गरीब ब्राह्मण पती–पत्नी दारिद्र्याने ग्रासलेले असतात. शेजारणीच्या सांगण्यावरून ती बाई शुक्रवारचे व्रत नेमधर्माने करते. तिचा भाऊ एक दिवस सहस्त्र भोजनाचा थाट मांडतो. पण, तो गरीब बहिणीला आमंत्रण देत नाही. तरीही मुलांना घेऊन ती जेवायला जाते. भाऊ तिला हाकलून देतो. पण, शुक्रवारच्या व्रतामुळे ती श्रीमंत होते. भावाला आपली चूक कळते.

या कहाणीसंग्रहात शनिवारच्याही दोन कहाण्या आढळतात. पहिल्या कहाणीत 'ब्राह्मणाची सून दारी आलेल्या मुलाला न्हाऊ–माखू घालते. त्याला जेवायला देते आणि उरलेसुरले आपण खाते.' असे चारही शनिवारी घडते. तिच्या या परोपकराने देव तिला प्रसन्न होतो आणि तिच्या परिस्थितीचे रूपांतर श्रीमंती थाटात होते. दुसऱ्या कहाणीत गरीब ब्राह्मणाला तीन सुना होत्या. एकदा शनिदेव कुष्ठरोग्याच्या रूपाने येतात. तेव्हा दोन सुना त्यांना रिकाम्या हाताने परत पाठवतात. त्यामुळे त्यांच्या घरात जे शिल्लक असेल ते नाहीसे होऊन, सर्वांना त्या दिवशी उपवास घडतो. धाकटी सून मात्र कुष्ठरोग्याला न्हाऊ–माखू घालून जेवायला देते. मग, शनिदेव तिला प्रसन्न होतात. नंतर नित्यनेमाने सर्वजण शनिदेवाची प्रार्थना करतात.

ऋषिपंचमीच्या कहाणीत ब्राह्मणबाई विटाळशीचा विटाळ घरात कालविते. त्याचा संपर्क तिच्या नवऱ्याला होतो. त्या दोषाने तिच्या नवऱ्याला बैलाचा व तिला कुत्रीचा जन्म प्राप्त होतो.

श्राद्धाच्या दिवशी खिरीच्या पातेल्यात साप गरळ टाकतो. ही खीर कुणी खाऊ नये, म्हणून कुत्री खिरीच्या पातेल्याला तोंड लावते. म्हणून सून कुत्रीला जळत्या कोलीताने मारते, उपाशी ठेवते. इकडे मुलगाही बैलाला म्हणजे त्याच्या वडिलांना नांगराला जुंपतो, उपाशी ठेवतो. कुत्री व बैलाचे हे संभाषण मुलगा ऐकतो त्याला वाईट वाटते. मग तो, ऋषींच्या सांगण्यावरून ऋषिपंचमीचे व्रत करतो. त्यामुळे त्याच्या आईवडिलांची पापापासून मुक्तता होते. असे प्रस्तुत कहाणीत आढळून येते. ज्येष्ठागौरीच्या कहाणीत ब्राह्मणाची मुले घरी गौरी आणण्याचा हट्ट धरतात. पण, गरिबीमुळे ब्राह्मणाला ते शक्य नसते. परिस्थितीवर रागावून तो जीव द्यायला जातो. पण, एका म्हातारीच्या सांगण्यावरून ती नवरा–बायको ज्येष्ठागौरीचे व्रत करतात. त्या म्हातारीच्या रूपातील देवी त्यांना प्रसन्न होते. संतती, संपत्ती मिळून ते सुखीसमाधानी होतात.

ललितापंचमीच्या कहाणीत व्रताचा भंग झाल्याने ब्राह्मणाच्या मुलाला दरिद्री अवस्था प्राप्त होते. तो भावाच्या सांगण्यावरून ललितापंचमीचे व्रत पुन्हा नित्यनेमाने सुरू करतो आणि पूर्वीसारखा श्रीमंत होऊन सुखी झाल्याचे दिसते. वसुबारसेच्या कहाणीत म्हातारी बाई सुनेला गव्हाळे–मुगाळे शिजवून ठेवण्यास सांगून, शेतात जाते. इकडे सून गव्हाळे–मुगाळे नावाच्या वासरांना मारून त्यांना चिरून शिजवून सासूची वाट पाहत बसते. हा प्रकार घरी आल्यानंतर पाहताच म्हातारी घाबरते. देवाचा धावा करते. तिचा निश्चय आणि निष्कपट अंत:करण पाहून देवाला तिची दया येते. तो वासरांना पुन्हा जिवंत करतो. मग, म्हातारी व सून नित्यनेमाने गाईवासरांची पूजा करताना या कहाणीत आढळून येतात.

सोमवतीच्या कहाणीत सोमा परटिणीच्या पुण्याईने ब्राह्मण मुलीचे वैधव्य टळते. सोमाच्या सांगण्यावरून ब्राह्मणाचे कुटुंब, त्याची मुलगी आणि सोमेच्या सुना सोमवतीचे व्रत नित्यनेमाने करतात. सोमवती आपल्यातील व्रताच्या प्रभावामुळे घरातील मेलेली माणसे जिवंत करते. असे या कहाणीत सांगितले आहे. बोडणाच्या कहाणीत राजाची नावडती सून, स्वप्नातील सवाष्णीने सांगितल्याप्रमाणे एकटीच बोडण भरते. मनोभावे व्रत करते आणि ती सर्वांची आवडती झाल्याचे कहाणीतून दिसून येते. श्रीविष्णूच्या कहाणीत एक ब्राह्मण महाविष्णू भेटावा म्हणून अठ्ठयाऐंशी हजार

वर्षे कडक तप करतो. त्यामुळे विष्णूदेवांना त्याची दया येते व ते त्याला प्रसन्न होतात असे या कहाणीत आढळते.

महालक्ष्मीच्या कहाणीत पाटमाधवराणी आवडती व चिमादेवराणी नावडती राणी होती. नंदनबनेश्वर नावाचा राजाचा एक शत्रू होता. राजा त्याला मारण्याची आज्ञा देतो. तेव्हा नगरातील एका म्हातारीचा मुलगाही या मोहिमेवर जातो. मध्यरात्री जंगलात नागकन्या–देवकन्या महालक्ष्मीचा वसा वसू लागताच तो मुलगाही वसा वसतो. देवीच्या आशीर्वादामुळे राजाचा शत्रू मरतो. आणि राजा बक्षीस म्हणून या मुलाला अर्धे राज्य देतो. आवडती राणी या नवलवाटाला म्हणजे मुलाला बोलवून व्रताची माहिती विचारते आणि त्याप्रमाणे व्रत करते. काही दिवसांनी म्हातारीचे सोंग घेऊन महालक्ष्मी पाटमाधवराणीच्या खोलीत येते. तर पाटमाधवराणीने पूजा मांडलेली नसते. तिला व्रताचा विसर पडतो. म्हातारी तशीच चिमादेवराणीच्या खोलीत जाते. तिथे तिला चिमादेवराणीने पूजा केलेली दिसते. मग, महालक्ष्मीदेवी तिला दर्शन देऊन आशीर्वाद देते. ती नावडतीची आवडती होते. इकडे पाटमाधवराणीच्या हातून व्रताचा भंग झाल्यामुळे महालक्ष्मीदेवी तिच्यावर कोपते आणि तिला बारा वर्षे वनात काढावी लागतात. ऋषींच्या सांगण्याप्रमाणे ती पुन्हा महालक्ष्मीचे व्रत करते आणि सुखीसमाधानी होते. असा आशय या कहाणीत आढळून येतो.

संतोषीमातेच्या कहाणीत म्हातारीला सात मुले व सात सुना होत्या. ती धाकट्या सुनेचा खूप छळ करते. शेवटी ती संतोषीमातेचे व्रत करते. त्यामुळे देवी तिच्यावर प्रसन्न होते. घरात सुखसंपत्ती आल्यामुळे म्हातारीलाही सुनेबद्दल प्रेम निर्माण झाल्याचे आढळते. वैभवलक्ष्मीच्या कहाणीत गोविंदराव व सुशीला हे दांपत्य सुखाने रहात असतात. पण, काही दिवसांनी गोविंदराव व्यसनी बनतात. घरातील संपत्ती नाहीशी झाल्यामुळे त्यांना दैन्यावस्था प्राप्त होते. एका साधूच्या सांगण्यावरून सुशीला वैभवलक्ष्मीचे मनोभावे व्रत करते. त्यामुळे तिची पूर्वावस्था तिला प्राप्त होऊन दोघेही नवराबायको सुखासमाधानाने राहतात असे कहाणीत सांगितले आहे.

अशा तऱ्हेने स्त्रियांच्या 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील चौतीस कहाण्यांचा आशय पाहिला.

**प्रकरण चौथे :-**

तिसऱ्या प्रकरणात 'सचित्र व सुबोध कहाण्यासंग्रह' या पुस्तकातील कहाण्यांचा आशय पाहिल्यानंतर चौथ्या प्रकरणात स्त्रियांच्या कहाण्यांचा रूपबंध याविषयीचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास मला विशेष महत्त्वाचा वाटला.

कहाण्यांचे बहिरंग तपासून पाहणे, त्यातील कहाण्यांची भाषाशैली, मांडणी, कथनशैली, कहाण्यातील संवाद, सांकेतिकता, ईहवादी दृष्टिकोन, नीतीची शिकवण, पुनरावृत्ती, अद्भूतता, वस्तुमात्रांवरील मानवी आरोपण या घटकांचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

कहाणीत जे सांगितले आहे, त्यापेक्षा ते कसे सांगितले आहे हे उलगडून दाखविणे महत्त्वाचे वाटले. व्रतकथांची भाषाशैली ही अत्यंत साधी, सोपी, स्त्रियांना समजेल अशी अर्थपूर्ण, रसाळ आणि मनाला मोहून टाकणारी अशी आढळते. या कहाण्यांतील बहुतेक वाक्यात कर्ता, कर्म, क्रियापद एवढेच असते. संकीर्ण किंवा मिश्रवाक्ये फारशी आढळत नाहीत. कहाणीतील भाषा ही गद्यपद्यमिश्रीत आढळते. त्यातील कथेचा काल आणि त्याचे स्थळ हे बहुधा स्पष्ट होऊ दिले जात नाही. तो काळ फार जुना आढळतो. कहाणीत जास्तीत जास्त सामान्यनामांचा उल्लेख आढळतो. क्वचितच कुठेतरी विशेषनामे वापरलेली दिसतात. कहाणीत छोटी-छोटी वाक्यरचना आढळते. त्या वाक्यांना एक विशिष्ट प्रकारचा ताल-लय-नाद असल्याचे दिसले.

भाषेला व्याकरणाची बंधने आढळत नाहीत. त्यामुळे ती भाषा अभिव्यक्तीप्रमाणे हवी तशी वळलेली, लवचिक अशी आढळते. शद्ब, वाक्यांश, लय, आघात, स्वर, उच्चारातील मृदुत्व इत्यादी अंगांनी कहाण्यांची भाषा आविष्कृत झालेली आढळते. कहाण्यांतील भाषेत अभ्यस्त शब्दांचा आणि जुन्या शब्दांचा सढळ वापर केलेला आढळतो. यातून कथांचे प्राचीनत्व दिसते. त्यामुळे भाषेला एक प्रकारची गेयता, प्रवाहीपणा प्राप्त झालेला दिसतो.

कथानकाच्या मांडणीसाठी आरंभ, मध्य आणि शेवट या तीन गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात. कहाण्यांची सुरुवात तीन प्रकारची आढळते. ज्याच्याविषयी कहाणी आहे त्याच्या संबोधनाने काही कहाण्या सुरू होतात. तर काही कहाण्या 'आटपाट नगर होतं' या शद्बांनी सुरू होतात.

संबोधनाने सुरु होणाऱ्या कहाण्यांत देखील 'आटपाट नगर होतं' ही स्थल-सूचना आढळते. विशिष्ट काळ अथवा स्थल असा निर्देश नसतो. पण, कहाणीचा म्हणून असा स्थल-कालपट आढळतो. कहाणीच्या आशयात मध्यभागी कहाणी न ऐकणे आणि त्यामुळे आलेली संकटे, समस्या, गुंता व कहाणी ऐकल्याने मिळणारे फळ, होणारा लाभ, यांचे वर्णन आढळते. कहाणीत असणारा सर्व विस्तार 'शेवटात' एकत्रित झालेला आढळतो. प्रत्येक कहाणीचा शेवट हा सुखांतच आहे. या कहाण्यांना शोकांतिका नाही. कहाणीच्या मध्यात असणारा संघर्ष, समस्या, गुंता यांची शेवटी उकल केलेली आढळते. कहाण्यांचा शेवट सामान्यत: 'ही साठां उत्तराची कहाणी पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण' या वाक्याने केला आहे.

कहाण्यातील संवाद नाट्यपूर्ण आणि नादमय आहेत. बहुधा व्रतकथांत संवादाची सलगता आढळते. संवादात साधी, सोपी, बोलीभाषा आलेली आहे. त्यात गद्याचा रूक्षपणा कोठेच जाणवत नाही. यातील संवाद सर्वसाधारणपणे प्रश्नोत्तरात्मक आहेत.

कहाण्यांची कथनशैली गीतमय आहे. छोटी वाक्ये, यमक आणि प्रासयुक्त रचना यांमुळे ही शैली नेहमीच्या गद्यापेक्षा वेगळी आढळते. कहाणी सांगणे हे एक प्रकारचे कथननाट्यच आहे असे वाटले. यातील छोट्या वाक्यरचनेमुळे स्त्रियांना कहाणी ऐकायला, त्यातील आशय व अर्थ समजावून घ्यायला सोईस्कर ठरलेले आढळते.

या कहाण्यांच्या रचनेमध्ये सांकेतिकता आढळते. त्याच्या रचनेचे एक वैशिष्ट्यपूर्ण तंत्र आहे. त्यातील प्रारंभ साधा आणि सुटसुटीत असून शेवट सुखांत आढळतो. परिच्छेदाची रचना काव्याप्रमाणे असून त्यात आवर्तन आढळते. व्रताचा आरंभ आणि शेवट हा सांकेतिक पद्धतीने झाल्याचे आढळते.

व्रतकहाण्यांतल्या ईहवादी दृष्टिकोनामुळेच व्रतकथांची 'लोकाभिमुखता' टिकून आहे असे वाटते. व्रतकथेमधून कुठलाही मोक्षप्राप्तीचा, पारलौकिक जीवनाचा उल्लेख आढळत नाही. याउलट, फक्त आपले लौकिक जीवन सुखी व्हावे, समृद्ध व्हावे एवढी एकच प्रबळ इच्छा



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

व्रतपालनाच्या मुळाशी आढळते. व्रते करण्यामागे, कहाण्या वाचण्यामागे लोकांचा ईहवादी दृष्टिकोन आढळतो. संकट दूर होणे, वैधव्य टळणे, संतती-संपत्ती मिळणे, पुण्य लाभणे, कौटुंबिक सुखप्राप्ती होणे, सुखसमाधान मिळणे या हेतूनेच लोक व्रते करताना, कहाण्या वाचताना आढळतात.

कहाण्यांतून नीतीची शिकवण दिल्याचे आढळते. एकमेकांशी नीतीने, सदाचाराने वागावे हा भारतीय धर्माचा पाया कहाण्यांत आढळतो. कहाणीत चमत्कार आहेत. व्रताची पद्धत आहे, मनोभावे पूजा करण्याचे आवाहन आहे; पण त्यामध्ये भोवतालच्या माणसांना दु:ख न देण्याचा आदेश आढळतो. कहाण्यातील भक्तिमार्ग हा सर्वांचे हित चिंतणारा, कल्याण साधणारा असा आहे. ' उतू नका, मातू नका, घेतले व्रत सोडू नका. सर्वांशी प्रेमाने वागा. घरात कलह करू नका. अतिथी अभ्यागताचे स्वागत करा.' अशी नीतीची शिकवण कहाण्यात आढळते.

पुनरावर्तन हा कहाण्यांचा प्राण आहे असे वाटते. कहाणीमध्ये अनेक शद्बांची, वाक्यांची पुनरावृत्ती केलेली आढळते. पुनरावृत्तीने कहाणीतील भाषेला एक प्रकारची नादमयता प्राप्त होते. कहाण्यांत ठिकठिकाणी अद्‌भूतता किंवा चमत्कार आढळतात. कहाण्यांतील अद्‌भूतरम्य वातावरणामुळे कहाणीचे आकर्षण वाढते असे वाटते. त्यात कुतूहल जागृती, उत्कटता आढळते. कल्पकतेने नवनवीन प्रसंग चित्रित केलेले दिसतात. कहाणीतील चमत्कारांमधून कृती, घटना व प्रसंग यांच्याद्वारे व्यक्तीच्या शक्तीबाहेरील गोष्टी घडल्याचे आढळते.

काही व्रतकहाण्यांत वस्तुमात्रांवर मानवी आरोपण केलेल्याचे आढळते. या कहाण्यातील मानवी व्यक्ती तर बोलतातच, पण त्याचबरोबर नाग, कुत्री, बैल, दिवा यांसारखे प्राणीही बोलताना आढळते. या प्राण्यांना मानवाप्रमाणेच भावभावना आहेत. त्यांची विचार करण्याची पद्धत, राहणीमान, त्यांचे सुखदु:ख हे हुबेहुब मानवाप्रमाणेच चित्रीत झाल्याचे आढळते.

'स्त्रियांच्या कहाण्यांचा रूपबंध' या चौथ्या प्रकरणात कहाण्यांची भाषाशैली कशी असते हे पाहिले. याशिवाय कहाण्यांची मांडणी, कहाण्यातील संवाद, कहाण्यांची कथनशैली, कहाण्यातील सांकेतिकता, कहाण्यांतील ईहवादी दृष्टिकोन, कहाण्यातील नीतीची शिकवण, कहाण्यातील पुनरावृत्ती, कहाण्यातील अद्‌भूतता, कहाण्यातील वस्तुमात्रांवर मानवी आरोपण या घटकांचा अभ्यास करून त्यातील रूपबंध उलगडण्याचा विशेष प्रयत्न केलेला आहे.

एक अभ्यासक म्हणून जे वाटले ते येथे नोंदवले आहे. 'सचित्र व सुबोध कहाण्या' संग्रहातील कहाण्यांचा अभ्यास करून, त्यातील रूपबंध उलगडण्याचा प्रयत्न केला आहे, असे म्हणावेसे वाटते. शेवटी ग्रंथसूची दिलेली आहे.

रूपबंधाच्या स्वरूपाचा शोध घेताना असे आढळले की, मूळ घटकांचे स्वरूप आणि त्या घटकांची मांडणी किंवा रचना त्या-त्या रचनाप्रकाराचा रूपबंध निश्चित करीत असते. स्त्रियांच्या कहाण्यांच्या संदर्भात विचार करता स्त्रियांच्या भावभावना, विचार, अनुरूप शद्बांची वर्णरचना, उच्चारातील मृदुत्व, काठिण्य, ताल-लय-सूर, भाषेचा लवचिकपणा, छोटी-छोटी वाक्ये या अशा विविध घटकांतून रूपबंध उलगडत जातो. कहाणीतील भाषा ही गद्यपद्यमिश्रीत आढळते. ही भाषाशैली अत्यंत साधी, सोपी, स्त्रियांना समजेल अशी अर्थपूर्ण, रसाळ आणि मनाला मोहून टाकणारी अशी आढळते. कहाण्यांची सुरूवात तीन प्रकारची आढळते. ज्याच्याविषयी कहाणी आहे त्याच्या संबोधनाने काही कहाण्या सुरू होतात तर काही कहाण्या 'आटपाट नगर होतं' या शब्दांनी सुरू होतात. कहाण्यातील संवाद नाट्यपूर्ण आणि नादमय आहेत. या संवादात साधी, सोपी, बोलीभाषा आलेली आहे. यातील संवाद सर्वसाधारपणे प्रश्नोत्तरात्मक आहेत. कहाण्यांची कथनशैली गीतमय आहे. कहाणी सांगणे हे एक प्रकारचे कथननाट्यच आहे असे वाटले. यातील छोट्या वाक्यरचनेमुळे स्त्रियांना कहाणी ऐकायला, त्यातील आशय व अर्थ समजून घ्यायला सोयीस्कर असल्याचे आढळते.

या कहाण्यांच्या रचनेमध्ये सांकेतिकता आढळते. त्यातील प्रारंभ साधा आणि सुटसुटीत असून शेवट सुखांत आढळतो. व्रते करण्यामागे, कहाण्या वाचण्यामागे लोकांचा ईहवादी दृष्टिकोन आढळतो. संकट दूर होणे, वैधव्य टळणे, संतती-संपत्ती मिळणे, पुण्य लाभणे, कौटुंबिक सुखप्राप्ती होणे, सुखसमाधान मिळणे या हेतूनेच लोक व्रते करताना, कहाण्या वाचताना आढळतात. कहाण्यातील भक्तिमार्ग हा सर्वांचे हित चिंतणारा, कल्याण साधणारा असा आढळतो. 'उतू नका, मातू नका, घेतले व्रत टाकू नका. सर्वांशी प्रेमाने वागा. घरात कलह करू नका. अतिथी अभ्यागताचे स्वागत करा.' अशी नीतीची शिकवण कहाण्यात आढळते. कहाणीमध्ये अनेक शद्बांची, वाक्यांची

पुनरावृत्ती केलेली आढळते. या पुनरावर्तनामुळे कहाणीला एक प्रकारचा श्रवणीय ठेका प्राप्त झाल्याचे आढळते. कहाण्यातील अद्‌भूतरम्य वातावरणामुळे कहाणीचे आकर्षण वाढते असे वाटते. कहाणीतील चमत्कारांमधून कृती, घटना व प्रसंग यांच्याद्वारे व्यक्तीच्या शक्तीबाहेरील गोष्टी घडल्याचे आढळते. या कहाण्यातील मानवी व्यक्ती तर बोलतातच, पण नाग, कुत्री, बैल यासारखे प्राणी आणि दिव्यांसारख्या वस्तूही बोलताना आढळतात. या प्राण्यांना मानवाप्रमाणेच भावभावना असल्याचे जाणवते. त्यांची विचार करण्याची पद्धत, राहणीमान, त्यांचे सुखदु:ख मानवाप्रमाणेच चित्रित झाल्याचे आढळते. लक्षणीयता, आविष्कारात्मकता, वैशिष्ट्यपूर्णता या सौंदर्याची जाणीव निर्माण करणाऱ्या घटकांनी साहित्यकृतीला रूपबंध प्राप्त होत असतो, असे अभ्यासाअंती आढळून आले आहे.

*****

# साधन ग्रंथसूची

पृष्ठ क्रमांक : १५७

## साधन ग्रंथसूची

१) रायकर सुधाताई संपादक, 'सचित्र व सुबोध कहण्यासंग्रह',
रायकर ब्रदर्स पब्लिशिंग हाऊस, मुंबई, नवीन आवृत्ती २००९.

*****